| सरकारी कर्मचारीबाबत खालीलपैकी कोणते गुन्हे घडल्यास कोणती कलमे लावावीत. | | | | |
|---|---|---|---|---|
| **क्र** | **गुन्ह्याचा प्रकार** | **समाविष्ट बाबी** | **लावावयाचे कलम** | **शिक्षेचे स्वरुप** |
| 1 | **सरकारी कर्मचारी यांच्यावर हल्ला** | (1) खुनाचा प्रयत्न करणे; (2) इच्छापुर्वक दुखापत केल्यास; (3) इच्छापुर्वक जबर दुखापत केल्यास (जबर दुखापतीची व्याख्या वाचा कलम 320); (4) घातक हत्यारानी जबर दुखापत केल्यास; (5) अवैध कृती करण्याच्या उद्देशाने जबर दुखापत केल्यास; (6) लोकसेवकास कर्तव्यापासुन परावृत्त करण्यासाठी जबर दुखापत करणे; (7) इतरांचे जीवित व व्यक्तीगत सुरक्षीतता आणणाऱ्या कृतीने दुखापत / जबर दुखापत पोचवणे; (8) कोणतेही कारण नसताना हमला किंवा फौजदारी बलप्रयोग करणे; (9) कर्तव्य पार पाडताना हमला किंवा बलप्रयोग करणे; (10) अशा कामासाठी अपप्रेरणा देणारी व्यक्ती असल्यास | 307, 323, 325, 326, 327, 329, 332, 333, 337/338, 352, 353, 109, 114, 34 | 10 वर्षे, 1 वर्षे, 7 वर्षे, 10 वर्षे, 10 वर्षे, 10 वर्षे, 3 वर्षे, 3 वर्षे, 6 महिने/2 वर्षे, 3 महिने, 2 वर्षे, |
| 2 | **जमाव करुन सरकारी कर्मचारीस दमदाटी व शिवीगाळ करणे** | (1) देह, लौकीक व मालमत्ता यास क्षती पोचविण्याची धमकी दिल्यास; (2) निनावी संदेशाद्वारे धमकी देणे; (3) अशा कामासाठी अपप्रेरणा देणारी व्यक्ती असल्यास | 353, 34, 506, 508, 109, 114 | 2 वर्षे, 2 वर्षे |
| 3 | **जबरदस्तीने कार्यालयात घुसणे व साहित्याची मोडतोड करणे** | (1) जो कोणी हानी, नुकसान पोचविण्याच्या उद्देशाने आगळीक करतो; (2) 50 रु किमतीचे नुकसान करुन आगळीक केल्यास; (3) शांतता भंग करण्याच्या उद्देशाने अपमान करणे; (4) अशा कामासाठी अपप्रेरणा देणारी व्यक्ती असल्यास | 353, 426, 427, 504, 109,114 | 2 वर्षे, 3 महिने, 2 वर्षे, 2 वर्षे, |
| 4 | **सरकारी कर्मचाऱ्यावर दबाब आणणे व आत्महत्येस प्रवृत्त करणे** | आत्महत्येस अपप्रेरणा देणे. | 306, 109, 114 | 10 वर्षे, |
| 5 | **सरकारी कर्मचाऱ्यावर दबाव आणुन पैशाची मागणी करणे** | (1) पैशाची मागणी करणे; (2) तशा प्रकारची भिती निर्माण करणे | 384, 385 | 3 वर्षे, 2 वर्षे |
| 6 | **महिला कर्मचारी यांना दमदाटी व शिवीगाळ करणे** | (1) सरकारी कामकाज करत असताना महिलेचा विनयभंग करण्याच्या उद्देशाने हमला किंवा बलप्रयोग करणे;(2) स्त्री चा विनयभंग होईल असे हावभाव व उच्चार करणे; (3) अशा कामासाठी अपप्रेरणा देणारी व्यक्ती असल्यास | 354, 353, 509, 109, 114 | 2 वर्षे, 2 वर्षे, 1 वर्षे |
| 7 | **सरकारी कार्यालयात गोंधळ घालणे** | (1) जो कोणी हानी, नुकसान पोचविण्याच्या उद्देशाने आगळीक करतो; (2) 50 रु किमतीचे नुकसान करुन आगळीक केल्यास; (3) शांतता भंग करण्याच्या उद्देशाने अपमान करणे; (4) सार्वजानीक प्रशांतता विरुध्द अपराध होईल अशी कृती; (5) अशा कामासाठी अपप्रेरणा देणारी व्यक्ती असल्यास | 353, 426, 427, 504, 505, 109,114 | 2 वर्षे, 3 महिने, 2 वर्षे, 2 वर्षे, 3 वर्षे |
| 8 | **सरकारी कर्मचाऱ्यासोबत वाद घालणे व धमकी देणे** | (1) शांतता भंग करण्याच्या उद्देशाने अपमान करणे; (2) सार्वजानीक प्रशांतता विरुध्द अपराध होईल अशी कृती; (3) अशा कामासाठी अपप्रेरणा देणारी व्यक्ती असल्यास | 504, 505, 109,114 | 2 वर्षे, 3 वर्षे |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 9 | **लोकसेवकास कोंडुन, बांधुन ठेवणे** | (1) कोणत्याही व्यक्तीस कोणत्याही दिशेने जाण्यास अटकाव करेल;(2) विवक्षित सीमांच्या पलीकडे जाण्यास प्रतिबंध करेल; (3) अशा कामासाठी अपप्रेरणा देणारी व्यक्ती असल्यास | 341, 342, 109, 114 | 1 महिना, 1 वर्षे, |
| 10 | **अवैध गौण खनिज वाहतुक आणि यावर कारवाई करताना वाद दंगा झाल्यास** | 1) विना परवाना गौण खनिज वाहतुक, उत्खनन करणे. (2) अनधिकृत वाहतुक पकडले असता मोठ्या प्रमाणात लोक जमा करुन दंगा करुन दमदाटी करणे, मारहाण करणे. | **IPC** चे 379, 120 ब, 34, 353, 152, 504, 506, 109 आणि **Mines & Minerals Regulation Act** 1957 चे कलम 21(1), 21(2) | वेगवेगळ्या शिक्षा |
| 11 | **शासकीय जमीनीवरील अतिक्रमण, बांधकाम करणे** | (1) शासकीय जमीनीवर अतिक्रमण करणे. (2) शासकीय जमीनीवर विनापरवाना विकास करणे. | **IPC** 447, **MRTP** Act कलम 52 | वेगवेगळ्या शिक्षा |
| 12 | **खोटा पुरावा देणे** | (1) खोटा आहे हे माहिती असुन कोटा पुरावा देणे; (2) खोटा पुरावा रचणे; (3) न्यायीक कार्यवाहीत खोटा पुरावा देईल. | 193 | 7वर्षे आणि 3 वर्षे |
| 13 | **खोटे प्रमाणपत्र देणे** | एखादे प्रमाणपत्र खोटे आहे हे माहिती असताना खरे आहे असे समजुन पुरावा म्हणुन देणे. | 198 | |
| 14 | **प्रतिज्ञापत्रात खोटे कथन करणे** | प्रतिज्ञापत्रात खोटी माहिती, मजकुर कथन करणे. | 199 | 3 वर्षे |
| 15 | **प्रतिज्ञापत्र खोटे असताना खरे म्हणुन वापरणे.** | प्रतिज्ञापत्र किंवा त्यातील माहिती खोटी आहे हे माहित असताना खरे म्हणुन वापरणे. | 200 | 3 वर्षे |
| 16 | **न्यायालयात अप्रामाणीकपणे खोटी मागणी हक्क सांगणे.** | दुसऱ्यास नुकसान पोचविण्याच्या उद्देशाने न्यायालयात खोटी मागणी हक्क सांगणे. | 209 | 2 वर्षे |
| 17 | **न्यायीक कार्यवाहीतील लोकसेवकाचा उद्देशपुर्वक अपमान करणे** | न्यायीक कार्यवाही करीत असलेल्या लोकसेवकाचा उद्देशपुर्वक अपमान करणे किंवा त्यांच्या कामात व्यत्यय आणणे. | 228 | 6 महिने |
| 18 | **संगणक, लॅपटॉप, मोबाईल यास नुकसान पोचविणे.** | (1) संगणक, लॅपटॉप, मोबाईल यांची तोडफोड करणे; (2) संगणक, नेटवर्क, सर्व्हर कामात व्यत्यय आणणे. (3) डेटा चोरी करणे, नष्ट करणे; (4) संगणक, मोबाईल चोरी करणे. | IT Act 2000 चे कलम 43D, 66, IPC 426, 477A; IT Act 43E, 66; 43B,66, 66B; 66B, 379 | वेगवेगळे दंड आणि कारावास |
| 19 | **घडलेल्या अपराधाबद्दल खोटी माहिती सांगणे** | जो अपराध घडला आहे त्याची माहिती न देता किंवा त्याबद्दल खोटी माहिती देणे | 203 | 2 वर्षे |

अनेक वेळा सरकारी अधिकारी व कर्मचारी यांच्यावर हल्ले होतात. असे अधिकारी व कर्मचारी जेव्हा गुन्हा दाखल करण्यासाठी पोलीस ठाण्यात जातात तेव्हा निश्चीत कोणती कलमे लावली पाहीजेत जेणेकरुन सदर गुन्हा हा दखलपात्र होईल व जास्तीत जास्त शिक्षा आरोपीस देता येईल, याबद्दल माहिती नसल्याने पोलीस अधिकारी जे कलम लावतील ते मान्य करतो. सबब वरीलपैकी कोणत्या स्वरुपाचा गुन्हा घडल्यास कोणती कलमे लावावीत एव्हाना हीच कलमे लावणेबाबत आपण आग्रह धरले पाहीजे. तसेच सदर कलमांचा गुन्हयांच्या अनुषंगाने आग्रह धरणेपुर्वी भारतीय दंड संहिता आणि संबंधीत कायद्यातील ही कलमे एकदा सर्वानी अवश्य वाचुन घ्यावेत......

**Shashikant S. Jadhav. Naib Tahsildar. 9923593063**